।। श्री ।।

# श्री रुक्मिणी सहकारी बँक लि., श्रीगोंदा

"सिटी प्राईड" बिल्डींग, दौंड-जामखेड रोड, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा जि. अ.नगर पिन - ४१३७०१ फोन : (०२४८७) २२०५५०

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांकरिता)**

सर्व सभासद बंधू भगिनींना विनंती की, आपल्या बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. ३१/०८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता **तुळशिदास मंगल कार्यालय, श्रीगोंदा, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर** येथे बँकेचे चेअरमन सीए. श्री. वसंतराव बापुराव गुंड यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेली आहे. सदर सभेस पुढील विषयांवर चर्चा करण्यात येईल, तरी आपण उपस्थित रहावे ही विनंती.

### -: सभेपुढील विषय :-

१) मागील दि. ०७/०९/२०२४ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचुन कायम करणे.

२) मा. संचालक मंडळाने सादर केलेल्या सन २०२४-२५ च्या वार्षिक अहवालावर विचार विनिमय करणे व तो स्विकृत करणे, तसेच दि. ३१ मार्च २०२५ अखेरचे ताळेबंद व नफा तोटा पत्रकास मंजुरी देणे.

३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या सन २०२४-२५ च्या नफा वाटणीस मंजुरी देणे.

४) सन २०२४-२५ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालावर चर्चा करणे व तो स्विकृत करणे.

५) सन २०२४-२५ च्या वैधानिक लेखापरीक्षण दोष दुरुस्ती अहवालावर चर्चा करणे व तो स्विकृत करणे.

६) संचालक मंडळाने सन २०२५-२६ साठी सादर केलेल्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे तसेच सन २०२४-२५ च्या अंदाजपत्रकातील जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.

७) सन २०२५-२६ साठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रकानुसार शिफारस केलेल्या वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीस व त्यांचे मानधनास मंजुरी देणे.

८) संचालक मंडळ, सदस्य व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम ७५(२) नुसार माहिती घेणे.

९) मा. संचालक मंडळास सन २०२५-२६ साठी बाह्य निधी / कर्ज उभारणीचे अधिकार देणे.

१०) मा. सभासद, संचालक व सेवकांना दिलेल्या प्रशिक्षणाचा आढावा घेणे व पुढील प्रशिक्षण देणेबाबत कार्यवाही करणे.

११) बँकेसाठी स्वमालकीच्या जागा/इमारत खरेदी करणे, दुरुस्ती करणे तसेच अतिरिक्त जागेची विक्री करणे व खरेदी केलेल्या जागांची नोंद घेणे.

१२) बँकेच्या स्टाफींग पॅटर्न व सेवा नियमाबाबत विचार विनिमय करणे.

१३) बँकेचा लाँग टर्म परसेक्टीव (डेव्हलपमेंट) प्लॅन व वार्षिक कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यास मान्यता देणे.

१४) बँकेच्या पुणे जिल्ह्यातील नऱ्हे शाखा स्थलांतर / विलीनीकरण करणेबाबत विचार विनिमय करणे.

१५) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची रजा मंजूर करणे.

१६) मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

मा. संचालक मंडळाच्या आदेशावरुन<br>श्री. अशोक विठ्ठल मडके<br>व्यवस्थापक

स्थळ :- श्रीगोंदा<br>दि. :- १४/०८/२०२५

---

### ❊ सभासदांना विशेष सुचना ❊

१) गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास ही सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी सकाळी ११.३० वाजता सुरु होईल व विषयपत्रिके नुसार सभेचे कामकाज होईल, त्यावेळी गणसंख्या पूर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) मा. सभासदांना वार्षिक अहवालाची प्रत मिळाली नसल्यास ती बँकेचे मुख्य कार्यालय व बँकेच्या सर्व शाखामध्ये प्राप्त होईल, तसेच बँकेचे संकेत स्थळ www.shrirukminibank.com वर उपलब्ध आहे.

३) मा. सभासदांना वरील विषयासंबंधी काही प्रश्न अथवा सुचना करावयाच्या असल्यास त्यांनी त्या लेखी स्वरुपात दि. २८/०८/२०२५ अखेर श्रीगोंदा येथील बँकेच्या मुख्य कार्यालयात, कार्यालयीन कामकाजाच्या वेळेत पोहोचतील अशा बेताने पाठवाव्यात.

४) ज्या सभासदांनी पोटनियमाप्रमाणे किमान धारण करावयाच्या भाग रक्कमेचा भरणा केलेला नाही, त्यांनी सदर रकमेचा त्वरीत भरणा करावा, तसेच बँकेच्या किमान सेवांचा लाभ घ्यावा.

५) सभासदांनी आपले सभासद अर्ज तपासून त्यातील माहिती, वारस नोंद बरोबर असल्याची खात्री करावी, फोटो, मोबाईल नंबर व इ-मेल दिले नसल्यास त्वरीत द्यावेत. तसेच ज्या सभासदांनी यापूर्वी लाभांश रक्कम घेतली नसेल, त्यांनी मुख्य कार्यालयात / नजीकच्या शाखेमध्ये संपर्क साधुन ती घेऊन जावी.

६) सभासद खातेदारांनी/ग्राहकांनी आपली के.वाय.सी. कागदपत्रांची पूर्तता लवकरात लवकर करुन घ्यावी.

७) दि. ३१/०८/२०२५ रोजी वार्षिक सभेचे कामकाज संपल्यानंतर सभासदांसाठी प्रशिक्षणाचे आयोजन केलेले आहे. तरी सर्व सभासदांनी प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये अवश्य सहभाग घ्यावा.